|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/प्रश्नसंच/ ५२९ /२०२६ दि. ०४ / ०२ /२०२६

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महारष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना....**

**विषय:- प्रथम व व्दितीय वर्ष विज्ञान वर्गाच्या Open Elective (O.E.) या विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी व मराठी या दोन्ही माध्यमातून तयार करणेबाबत..**

**संदर्भ:-** मा.विद्या परिषद ठराव क्र. वि.प.ए- १००/२०२५दि.१७/१२/२०२५

**महोदय,**

वरील विषयाच्या अनुषंगाने विदित करण्यात येते की, विद्यापीठामार्फत शैक्ष. वर्ष २०२५-२६ मधील विविध वर्गाच्या / अभ्यासक्रमाच्या उन्हाळी -२०२६ च्या लेखी परीक्षा Backlog सह विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रांवर Descriptive (दिर्घोत्तरी) पध्दतीने माहे एप्रिल २०२६ पासून आयोजित करण्याचे नियोजित आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रथम व व्दितीय वर्ष विज्ञान वर्गासाठी NEP २०२० Pattern लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार या वर्गांच्या Open Elective विषयाच्या प्रश्नपत्रिकांमध्ये एकसारखेपणा असण्यासाठी इतर विषयांच्या प्रश्नपत्रिका प्रमाणेच **Chemistry-114 (O.E.)** या विषयाची प्रश्नपत्रिका इंग्रजी व मराठी अशा दोन्ही माध्यमातून परीक्षेला प्रविष्ठ विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असा ठराव मा. विद्या परिषदेत पारीत करण्यात आलेला आहे.(सोबत-मा.विद्यापरिषद ठराव क्र.वि.प.ए- १००/२०२५)

तेव्हा, उपरोक्त संदर्भिय ठरावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, माहे एप्रिल २०२६ पासून आयोजित उन्हाळी -२०२६ या लेखी परीक्षेपासून **प्रथम व व्दितीय वर्ष विज्ञान वर्गातील सर्व विषयांच्या Open Elective (O.E.) या विषयाच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी व मराठी अशा दोन्ही माध्यमातून तयार करण्यासाठी आपल्या महाविद्यालयात विज्ञान वर्गाचे विषय शिकवित असलेल्या सर्व शिक्षकांना आपल्या स्तरावर प्रश्नपत्रिका तयार करण्यास अवगत करुन देण्यात यावे, व सदरच्या परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.**

आपला विश्वासू

(प्रा.योगेश ना.पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:

१) मा. कुलगुरु महोदय, कबचौउमवि,जळगाव
२) मा.प्र-कुलगुरु महोदय, कबचौउमवि,जळगाव
३) मा.अध्यक्ष रसायनशास्त्र अभ्यासमंडळ, कबचौउमवि,जळगाव

## मा. विद्या परिषद

AR (Pre Exam)

**ए - १००/२०२५)** **( परीक्षा व मूल्यमापन मंडळ )**
मा. विद्या परिषद सदस्य प्रा.डॉ. गुणवंत हरी सोनवणे, पारोळा यांनी F.YB.Sc. (NEP-२०२०) Open Elective विषयाच्या प्रश्नपत्रिकांमध्ये एकसारखेपणा असणेबाबत विचारविनिमय करणेसाठीसाठी विषय सादर केला.

**ठराव क्र. वि.प.ए-१००/२०२५, दि. १७/१२/२०२५**

मा. विद्या परिषद सदस्य प्रा.डॉ. गुणवंत हरी सोनवणे, पारोळा यांनी F.YB.Sc. (NEP-२०२०) Open Elective विषयाच्या प्रश्नपत्रिकांमध्ये एकसारखेपणा असणेबाबत माहिती देतांना सांगितले की, ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत Botany-114. Zoology-114, Mathematics-114, Geography-114, Physics-114 .इत्यादी विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेतून उपलब्ध होतात. मात्र Chemistry-114 विषयाची प्रश्नपत्रिका फक्त इंग्रजी भाषेतून उपलब्ध होती.

यापुढील होणाऱ्या परीक्षांमध्ये Chemistry-114 विषयाची प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेतून उपलब्ध करून दिली जाईल, असे सर्वानुमते ठरले.

---

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव-४२५००१ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

कुलसचिव
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव